राज्यातील खाजगी कंत्राटी प्रवाशी वाहनांचे कमाल भाडेदर निश्चित करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक: एमव्हीआर-०४१२/प्र.क्र.३७८ (पु.बां.०७)/परि-२,

गृह (परिवहन) विभाग, दुसरा मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २७ एप्रिल, २०१८.

प्रस्तावना :-

राज्यातील प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांकडून मोठया प्रमाणात खाजगी कंत्राटी वाहनांचा वापर करण्यात येतो. अश्या प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांकडून खाजगी कंत्राटी वाहतूकीची ने-आण करणाऱ्या वाहतूकदारांकडून गर्दीच्या हंगामामध्ये अवाजवी भाडेवाढ करण्यात येते. अश्या खाजगी कंत्राटी वाहनांच्या भाडेदरासंदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालय येथे जनहित याचिका क्र.१४९/२०११ दाखल करण्यात आली होती. सदर याचिकेत मा.उच्च न्यायालयाने खाजगी कंत्राटी वाहनाचे भाडे निश्चित करण्याचे आदेश दिलेले होते. त्यानुसार सदर भाडे निश्चित करण्यासंदर्भात सेंट्रल इन्स्टिट्युट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट (सी.आय.आर.टी) पुणे या केंद्र शासनाच्या संस्थेची नियुक्ती करण्यात आली होती. सेंट्रल इन्स्टिट्युट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट (सी.आय.आर.टी) पुणे या संस्थेने खाजगी कंत्राटी वाहतूकीच्या विविध वर्गवारीतील सोई-सुविधा इ.चा अभ्यास करुन अहवाल सादर केला आहे. प्रवासी वाहतूकीसाठी वापरण्यात येणाऱ्या कंत्राटी वाहनांची वर्गवारी प्रामुख्याने वातानुकूलीत / अवातानुकूलीत/ शयनयान/शयनयान अधिक आसनव्यवस्था इ. विविध प्रकारात विभागली आहे. प्रत्येक वर्गवारीतील वाहनांचा मोटार वाहन कर, इंधन खर्च, देखभाल खर्च, प्रति/कि.मी. प्रचलन दर भिन्न असून सदरचे संपूर्ण वाहन हे कंत्राटी तत्वावर आरक्षित करण्यात येते. अश्या कंत्राटी परवाना प्राप्त वाहनधारकास टप्पा वाहतूक करण्याचे म्हणजे प्रवाश्यांना तिकीट देवून वेगवेगळया ठिकाणी चढ-उतार करुन प्रवास करण्याची अनुमती नाही. त्यामुळे खाजगी कंत्राटी परवाना वाहनांचे पूर्ण गाडीचे प्रति किलोमीटर कमाल भाडे निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे टप्पा वाहतूकीचे भाडे राज्य परिवहन प्राधिकरणाकडून निश्चित करण्यात येते. सदर भाडेदर विचारात घेवून खाजगी कंत्राटी परवाना वाहनाचे संपूर्ण बससाठी प्रति कि.मी.भाडेदर त्याच स्वरुपाच्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या संपूर्ण बससाठी येणाऱ्या प्रति कि.मी.भाडे दराच्या ५० टक्के पेक्षा अधिक राहणार नाही असे कमाल भाडेदर निश्चित करण्यात येत आहे. उदाहरण स्वरुपाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन

महामंडळाच्या विविध प्रकारच्या बसचे प्रति बस प्रति कि.मी.भाडे आणि त्या स्वरुपाच्या खाजगी कंत्राटी परवाना वाहनाचे बससाठी कमाल भाडे याचा तक्ता सोबतच्या परिशिष्टात नमूद केलेला आहे.

२. वरीलप्रमाणे खाजगी कंत्राटी परवाना वाहनांचे कमाल भाडे निश्चित करण्यात येत आहे, याचा अर्थ खाजगी कंत्राटी परवाना वाहनाचे भाडेदरात शासनाने भाडेवाढ केली असा होत नाही. खाजगी वाहतूकदारांनी स्पर्धात्मक वातावरणात वाजवी भाडे आकारुन प्रवाश्यांना वाहतूक सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. गर्दीच्या हंगामात मागणी-पुरवठा यामधील तफावतीमुळे मोठया प्रमाणात भाडेवाढ करुन प्रवाश्यांची आर्थिक पिळवणूक होवू नये या उद्देश्याने कमाल भाडे निश्चित करण्यात आले आहे.

३. सदर आदेशाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी. वरील कमाल भाडेदरापेक्षा अधिक भाडे आकारण्यात असल्यास सदर परवानाधारकांविरुध्द मोटार वाहन कायदा/नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०४२७१६५१२५१३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ghiratkar Nitin Jyotinath

Digitally signed by Ghiratkar Nitin Jyotinath
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bbb712ac44dfd391a1a4d7d8b24cf743fa81a59477dff3f6805f105ac91db1e0, cn=Ghiratkar Nitin Jyotinath
Date: 2018.04.27 16:53:45 +05'30'

(नि.ज्यो.घिरटकर)
कार्यासन अधिकारी, गृह (परिवहन) विभाग

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री, मंत्रालय, मुंबई.
४) मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
५) मा. सभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
६) मा. उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई

७) मा. उपसभापती,विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
८) मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा) यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
९) मा. विरोधी पक्षनेता (विधानपरिषद) यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई
१०) मा. संसद सदस्य (महाराष्ट्र राज्य)
११) मा.विधानसभा सदस्य (सर्व)
१२) मा.विधान परिषद सदस्य (सर्व)
१३) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
१४) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
१५) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
१६) सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव , मंत्रालय, मुंबई.
१७) अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), मुंबई.
१८) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
२०) महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई परिवहन उपक्रम, मुंबई.
२१) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई.
२२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई.
२३) संचालक, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, ठाणे/नाशिक/पुणे/नागपूर.
२४) सर्व पोलीस आयुक्त.
२५) सर्व विभागीय आयुक्त.
२६) सर्व जिल्हाधिकारी.
२७) सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक/पोलीस उप आयुक्त.
२८) सर्व विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ.
२९) सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी/सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी.
३०) सर्व वाहतूकदार संघटना (संबंधित प्रादेशिक /उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत)
३१) निवडसंग्रह-परि-२.

शासन निर्णय क्र. एमव्हीआर-०४१२/प्र.क्र.३७८ (पु.बां.०७)/परि-२, दि. २७/०४/२०१८ सोबतचे परिशिष्ट

सेवेचा प्रकार	रा.प. भाडे प्रति टप्पा / ६ कि.मी. (रु.)	आसन क्षमता	प्रति बस/प्रति कि.मी. भाडे (रु.)	कंत्राटी परवाना वाहनाचे प्रति बस/ प्रति कि.मी. कमाल भाडे (रु.) (रा.प.महामंडळाचे भाडे अधिक ५० टक्के धरुन)
अवातानुकूलीत				
साधी	६.३०	४४	४६.२०	६९.३०
निमआराम	८.६०	३९	५५.९०	८३.८५
वातानुकूलीत				
शिवशाही (टाटा/अशोक लेलँड)	८.९५	४४	६५.६४	९८.४६
शयनयान (टाटा/अशोक लेलँड)	१२.८८	३०	६४.४०	९६.६०
शिवनेरी (व्होल्वो/मर्सिडिज/स्कॅनिया)	१५.८०	४३	११३.२४	१६९.८६

*****